जा.क्र. 5235

आदेशार्थ सादर

पीजी विभाग

दि 16/10/2024

छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा या संस्थेच्या आस्थापनेवरील सहाय्यक प्राध्यापक, वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी, यांची रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशी नुसार 120 दिवसांकरिता पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे जाहिरात तयार करण्यात आलेली आहे. सदर जाहिरात प्रसिध्द करण्यास मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

सचिव भारतीय निवड आयोग यांचे पत्र दि 20/04/2024 नुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र आचार/0424/प्र क्र 162 (भाग 1) प्रशा-2 दि 06/05/2024 नुसार आचारसंहितेमधून सुट देण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत विधानसभा 2024 निवडणूक जाहिर झाली असून दि 15/10/2024 आचार संहिता जाहिर झाली आहे सदर आचारसंहितेमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदे भरण्यास सुट देण्यात आलेली आहे.

## जाहिरात

विषय- सहाय्यक प्राध्यापक, वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी, यांची रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशी नुसार 120 दिवसांकरिता भरण्याबाबत.

संदर्भ-1.शासन निर्णय १९९३

2शासननिर्णयक्रंपदनि- 2019/प्र.क्र./12/भाग-1/वैसेवा -2 दि. 1 फेब्रुवारी, 2021.

3.शासन निर्णय क्र एलईसी-4322/प्र.क्र.201/वैसेवा-3 दि.06/01/2023

4.शासन निर्णय क्रमांक एमईडी-2008/प्र.क्र.393/शिक्षण-2 दि.02/12/2023

5.मा.संचालनालयाचे पत्र क्र DMER-12016/5/2022-EDU दि.19/01/2023.

6.मा.संचालनालयाचे पत्र क्र DMER-11020/13/2022-CETIT Date-13-01-2023.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या त्रृटीच्या पुर्ततेसाठी तसेच दैनंदिन रुग्णसेवा अबाधित राहण्याच्या दृष्टीने अधिष्ठाता, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा या संस्थेच्या आस्थापनेवरील अचिकित्सालयीन व चिकित्सालयीन विषयांतील रिक्त असलेली सहाय्यक प्राध्यापक (गट-ब), वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी-1 यांची पदे मा.संचालनालय, मुंबई यांच्या मार्फत बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवाराची नियुक्ती होईपर्यंत किंवा बदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा तदर्थ पदोन्नतीने कार्यरत सहयोगी प्राध्यापक मुळ पदावर पदावनत होईपर्यंत यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत, स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशीनुसार 120 दिवसांच्या कालावधीकरीता कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीत गुणवत्तेनुसार भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून खालील अटी.व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविण्यात येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

**अर्ज सादर करावयाचा कालावधी –दि. 17/10/2024 ते 23/10/2024 रोजी सायंकाळी 5.45 वाजे पर्यंत**

**मुलाखतीचा दिनांक व वेळ - दि. 24/10/2024 रोजी सकाळी** 11.00 **वाजता**

**मुलाखतीचे ठिकाण**- मा.अधिष्ठाता दालन, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा.

त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी (शासकीय सुट्टी वगळुन) या कार्यालयातून जाहिरातीच्या दिनांकापासून विहित कालावधीत अर्ज शुल्क रु.100/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) रोखपाल शाखेत भरुन अर्ज प्राप्त करुन घ्यावेत. अर्जात नमुद कागदपत्रे/ प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या प्रती अर्जासोबत जोडणे अत्यंत आवश्यक आहे. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रांसह साक्षांकीत केलेल्या प्रतींचा एक संच सोबत घेवून येणे आवश्यक आहे. उमेदवारांनी मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर रहावे. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास उमेदवारांचा कंत्राटी नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

**सहाय्यक प्राध्यापक** संवर्गातील 120 दिवसांकरीता भरावयाच्या पदांची माहिती खालील प्रमाणे आहे

**पदाचे नाव :- सहाय्यक प्राध्यापक**

एकुण पदे-32

| विभागाचे नाव | SC | ST | VJ-(A) | NT-(B) | NT-(C) | NT-(D) | SBC | OBC | EWS | SEBC | OPEN | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 13.0% | 7.0% | 3.0% | 2.5% | 3.5% | 2.0% | 2.0% | 19.0% | 10.0% | 10.0% | 28.0% | 100% |
| | | | | | | | | 6 | 3 | 3 | 9 | 32 |
| 32रिक्त पदांचे आरक्षण | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | | | | | |

वरील सहाय्यक प्राध्यापक सवंर्गातील 32 रिक्त पदांचे विषयनिहाय आवश्यक पदे खालीलप्रमाणे आहेत. उमेदवारांच्या उपलब्धतेनूसार उमेदवाराचा प्रवर्ग व रिक्त पदाचे आरक्षण यांचा विचार करुन अंतिम निवड समितीच्या शिफारशीनूसार करण्यात येईल.

| अ.क्र. | विषय | आवश्यक पदे | अ.क्र. | विषय | आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ANATOMY | 1 | 10 | PAEDIATRICS | 2 |
| 2 | PATHOLOGY | 2 | 11 | GENERAL SURGERY | 1 |
| 3 | PHARMACOLOGY | 1 | 12 | OPHTHALMOLOGY | 1 |
| 4 | MICROBIOLOGY | 2 | 13 | OBSTETRICS AND GYNAECOLOGY | 2 |
| 5 | FORENSIC MEDICINE | 2 | 14 | RADIO-DIAGNOSIS | 2 |
| 6 | COMMUNITY MEDICINE | 1 | 15 | ANAESTHESIOLOGY | 3 |
| 7 | GENERAL MEDICINE | 4 | 16 | ORTHOPEDICS | 2 |
| 8 | TB AND CHEST | 1 | 17 | EMERGENCY MEDICINE | 2 |
| 9 | PSYCIATRY | 1 | 18 | ENT | 2 |
| | | | | **Total** | 32 |

**पदाचे नाव :- वरिष्ठ निवासी**

एकुण पदे- 59

| विभागाचे नाव | SC | ST | VJ-(A) | NT-(B) | NT-(C) | NT-(D) | OBC | EWS | SBC | SEBC | OPEN | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 59 रिक्त पदांचे आरक्षण | 7 | 4 | 2 | 1 | 2 | 1 | 11 | 6 | 1 | 6 | 18 | 59 |

वरील वरिष्ठ निवासी सवंर्गातील 59 रिक्त पदांचे विषयनिहाय आवश्यक पदे खालीलप्रमाणे आहेत. उमेदवारांच्या उपलब्धतेनुसार उमेदवाराचा प्रवर्ग व रिक्त पदाचे आरक्षण यांचा विचार करुन अंतिम निवड समितीच्या शिफारशीनूसार करण्यात येईल.

| अ.क्र. | विषय | आवश्यक पदे | अ.क्र. | विषय | आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ANATOMY | 3 | 12 | PSYCIATRY | 1 |
| 2 | PHYSIOLOGY | 3 | 13 | PAEDIATRICS | 2 |
| 3 | BIOCHEMISTRY | 3 | 14 | GENERAL SURGERY | 4 |
| 4 | PHARMACOLOGY | 3 | 15 | ORTHOPEDICS | 2 |
| 5 | PATHOLOGY | 4 | 16 | OPHTHALMOLOGY | 1 |
| 6 | MICROBIOLOGY | 4 | 17 | OBSTETRICS AND GYNAECOLOGY | 2 |
| 7 | FORENSIC MEDICINE | 2 | 18 | RADIO-DIAGNOSIS | 2 |
| 8 | COMMUNITY MEDICINE | 3 | 19 | ANAESTHESIOLOGY | 3 |
| 9 | GENERAL MEDICINE | 4 | 20 | DENTISTRY | 1 |
| 10 | ENT | 1 | 21 | EMERG ENCY MEDICINE | 9 |

| अ.क्र. | विषय | आवश्यक पदे | अ.क्र. | विषय | आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|
| 11 | DERMATOLOGY VENREOLOGY & LEPROSY | 1 | 22 | TB & CHEST | 1 |
| | | | | Total | 59 |

**पदाचे नाव :- कनिष्ठ निवासी**

एकुण पदे- 22

| विभागाचे नाव | SC | ST | VJ-(A) | NT-(B) | NT-(C) | NT-(D) | OBC | EWS | SEBC | OPEN | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 22 रिक्त पदांचे आरक्षण | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 4 | 2 | 2 | 6 | 22 |

उक्त नमुद दर्शविलेल्या रिक्त जागांची संख्या प्रशासकीय कारणास्तव बदलण्याचे अधिकार प्रशासनास राहतील, तक्त्यात नमुद केलेल्या पद संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. वरील सर्व पदांसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदासाठी अर्ज मागविण्यात येत असून, वरील तक्त्याप्रमाणे रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येतील व तदनंतर रिक्त पद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

उमेदवाराची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरील पदांकरीता नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात 120 दिवसांसाठी असून, कोणतीही पूर्व सुचना न देता तात्पुरती कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच कनिष्ठ निवासी या पदावर नियुक्त होणा-या उमेदवारांना उपलब्ध विभागात काम करावे लागेल.

**अटी व शर्ती**-

1. **सहाय्यक प्राध्यापक** पदाची वेतन श्रेणी – सदरील उमेदवारांना दि.31/12/2020 च्या शासननिर्णयातील तरतुदीनुसार रु.1,00,000/- (अक्षरी रुपये एक लक्ष मात्र ) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहील. सदरील वेतन संस्थेत मंजुर असलेल्या मुळ अनुदानातुन 10-कंत्राटी सेवा या उद्दिष्टामधून भागविण्यात येईल.

2. **वरिष्ठ निवासी** या पदाची वेतनश्रेणी- शासन निर्णय क्रमांक एलईसी-4322/प्र.क्र.201/वैसेवा-3 दि.06/01/2023 व शासन निर्णय क्रमांक एमईडी-2008/प्र.क्र.393/शिक्षण-2 दि. 02/12/2013 अन्वये रु. 25000/- मुळ वेतन व प्रचलित दराने देय होणारा महागाई भत्ता लागु राहील.

3. **कनिष्ठ निवासी**-1 या पदाची वेतन श्रेणी- शासन निर्णय क्रमांक पदनि-2019/प्र.क्र.12/(भाग-1)/2019/वैसेवा-2 दि.01/02/2021 अन्वये रु.६,६००/- व इतर भत्ते.

4. <u>**वयोमर्यादा**</u>- किमान व कमाल वयोमर्यादा सहाय्यक प्राध्यापक व कनिष्ठ निवासी

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय | कमाल वय | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण/ महिला | | प्राविण्य प्राप्त खेळाडु | | दिव्यांग उमेदवार |
| | | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक/ अनाथ | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक/ अनाथ | |
| 25/10/2024 | 18 | 40 | 45 | 43 | 45 | 45 |
| **वरिष्ठ निवासी -45 वर्ष** | | | | | | |

<u>5.**शैक्षणिक अर्हता**</u>-

| पदाचे नाव | आवश्यक शैक्षणिक अर्हता | शेरा |
|---|---|---|
| | 1) MD/MS/DNB in the concerned subject.<br>One year as Senior Resident in the concerned subject in a recognized/ permitted medical college after acquiring MD/MS | |

| | | |
|---|---|---|
| **सहाय्यक प्राध्यापक** | degree | |
| **वरिष्ठ निवासी** | राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग यांच्या मानकानुसार संबंधित विषयात मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण. ( MD/MS/DNB ) | |
| **कनिष्ठ निवासी** | एम.बी.बी.एस पदवी उत्तीर्ण व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे कायम नोंदणी असणे आवश्यक. | |

उपरोक्त पदासाठीचे निकष खालीलप्रमाणे असून बंधपत्रित उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

6. गुणवत्ता यादी ही पदव्युत्तर पदवी परीक्षेच्या एमडी/एमएस/एमसीएच/डीएम/किंवा समतुल्य अर्हता प्राप्त परीक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल. संशोधन लेख (शोधनिबंध) राज्य व अखिल भारतीय स्तरावरील परिषदेतील सहभाग याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. तसेच सदर पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

7.जाहिरातीत प्रसिध्द करण्यात आलेली पद संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवलेले आहेत.

8.उमेदवार या महाविद्यालया व्यतिरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे व त्या ठिकाणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरिक्षणात सहभाग नोंदविला किंवा कसे --- असल्यास केव्हा (तारिख नमुद करावी) व तसेच अर्जा सोबत जोडावे.

9. ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असताना सतत जास्त कालावधीपर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

**टीप** :-

1 ज्या उमेदवारांना संचालनालयाकडुन मध्यवर्ती निवड प्रक्रिये दवारे यापुर्वी सहाय्यक प्राध्यापक, विशेषजज्ञ वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी या पदांकरिता शिफारस / निवड करण्यात आली आहे, असे उमेदवार या मुलाखतीस पात्र राहणार नाहीत.

2. निवड प्राप्त उमेदवारांना कोव्हिड १९ तथा आपत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगाने सेवा करणे बंधनकारक राहील.

10 **आवश्यक प्रमाणपत्रे** - अर्जासोबत खालील प्रामाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

I.एमबीबीएस ची सर्व गुणपत्रे व प्रयत्न प्रमाणपत्र, आंतरवासिता प्रमाणपत्र, पासिंग व डिग्री प्रमाणपत्र.

II.एम.डी/ एम.एस/डीएनबी परीक्षा गुणपत्रिका, पासिंग प्रमाणपत्र, डिग्री प्रमाणपत्र व प्रयत्न प्रमाणपत्र.

III.एम.बी.बी.एस व एम डी./एम.एस. पदवी/पदविका एमएनसी नोंदणी प्रमाणपत्र तसेच आवश्यक असल्यास नोंदणीचे नुतनीकरण.

IV.बंधपत्र प्रमाणपत्र.

V.अनुभव प्रमाणपत्र.

VI.मागासवर्गीय उमेदवारांसाठी जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यक असल्यास वैध नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र

VII.विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, इमाव, विमाप्र, साशैमाव तसेच आदुघसाठी प्रचलित शासकीय नियमानुसार वैधता असलेले उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉनक्रिमि लेअर प्रमाणपत्र आवश्यक.

VIII.जन्म तारखेचे प्रमाणपत्र.

IX. नावात बदलले असल्यास गॅझेटची प्रत.

X.आधार कार्ड व पॅन कार्डची प्रत.

11) सदर पदांकरीता उमेदवारांची नियुक्ती निव्वळ 120 दिवसांसाठी व अत्यंत तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपात राहील. 120 दिवसानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देऊन पुन्हा 120 दिवसांसाठी नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

12) निवड झालेल्या उमेदवारास छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा संस्थेतील कोणत्याही संलग्न रुग्णालयात नेमणूक केली जाईल व तेथे काम करावे लागेल. प्रशासनास आवश्यकता असल्यास यापैकी कोणतेही रुग्णालयात नेमणूकीत बदल होऊ शकेल. अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रति साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

13) सदर पदावर कार्यरत असताना आपणास खाजगी व्यवसाय करता येणार नाही.

14) सदर नियुक्तीही तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाहीत व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील. याबाबत कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

15) पदाचा राजीनामा देण्याकरीता एक महिन्याची पूर्वसुचना देणे आवश्यक राहील, अन्यथा नोटीस न देता पदाचा राजीनामा दिल्यास शेवटच्या एक महिन्याचे देय वेतन शासन खाती जमा करण्यात येईल.

16) भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोणत्याही टप्प्यावर पदस्थितीमध्ये बदल होऊ शकतो.

17) अर्ज भरण्याच्या प्रक्रीयेची माहिती (www.gmcsatara.org) या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

18)मुलाखतीचे व नियुक्तीचे सर्व अधिकार मा. अधिष्ठाता यांचे राहतील.

अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय सातारा

अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा.

प्रति,

1.उपरोक्त संबंधित सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा.

2.सुचनाफलक– अधिष्ठाता कार्यालय, विद्यार्थी विभाग, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा.

3.अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई, पुणे, सोलापुर, कोल्हापुर, अंबाजोगाई, लातुर, मिरज, नांदेड, अकोला, यवतमाळ, नागपुर, धुळे, औरंगाबाद, चंद्रपुर, गोंदिया, बारामती, सिंधुदुर्ग, अलिबाग, उस्मानाबाद, परभणी, रत्नागिरी, नंदूरबार, जळगाव, जालना.

4.रोखपाल, रोखपाल शाखा, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी महाविद्यालयाच्या इच्छुक सहाय्यक प्राध्यापक, वरिष्ठ निवासी उमेदवारांकडून (शासकीय सुट्टी वगळुन) या कार्यालयातुन जाहिरातीच्या दिनांकापासून विहित कालावधीत फॉर्म फी रु.100/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी.

प्रत-

1मा.सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

2मा.आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर

3मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई